**आर बी आय/२००५-०६/३१७**
**डि एन बी एस. पी. डी. सी. सी. स. ६४/०३.१०.०४२/२००५-०६**

**मार्च ७, २००६**

सर्व गैर बँकींग वित्तिय कंपन्या,
प्रकीर्ण गैरबँकीग कंपन्या,
आणि अवशिष्ट गैर बँकीग कंपन्या,

प्रिय महोदय,

**आपला ग्राहक जाणण्या संबंधी दिशा-निर्देश - अँटी मनी लॉडरींग स्डँर्डस (काळ्या पैशाला वैध करण्याला परावृत करण्यासाठी मानदंड)**

कृपया वरील विषयावरील आमचे दिनांक फेब्रुवारी २१, २००५ चे परिपत्रक सं. डि एन बी सी (पीडी). सीसी . ४८/१०.४२/२००४-०५ पहावे. या परिपत्रकानुसार गैरबँकींग वित्तीय कंपन्यांना असे सूचित केले होते की बँकींग परिचालन आणि विकास विभागाने जारी केलेल्या अनुदेशांच्या आधारावर नवीन खाती उघडण्यासाठी ग्राहकांना स्वीकृती संबंधी नीति आणि ग्राहकांना ओळखण्यासाठी प्रक्रिया बनवावी. गैर बँकींग वित्तीय कंपन्यांना असेही सूचित केले होते की त्यांनी त्यांच्या ग्राहकांचे कमी, मध्यम व उच्च जोखीम या ३ वर्गांत वर्गीकरण करावे. आमच्या दिनांक फेब्रुवारी २१, २००५ ला जोडलेल्या बँकींग परिचालन आणि विकास विभागाच्या परिपत्रकाच्या परिशिष्ट II मधील यादित दिलेल्या दस्तऐवजांच्या आधारावर ग्राहकांची ओळख व पत्त्यांची पडताळणी करणे देखील आपला ग्राहक जाणासंबंधीच्या दिशा - निर्देशांनुसार आवश्यक होते.

२. जरी वर निर्देश केलेल्या परिपत्रकात ओळख व पत्याच्या पुराव्या संबंधीच्या दस्तऐवजांमध्ये लवचिकतेची तजवीज आहे, तरीही, शहरी आणि ग्रामीण दोन्ही क्षेत्रांत, विशेषकरुन, कमी उत्पन्न असलेल्या वर्गात, अशा काही व्यक्ती असू शकतात की ज्या आपली ओळख व पत्याच्या संदर्भात गैरबँकींग वित्तिय कंपन्यांचे समाधान करण्यासाठी यातील कोणतेही दस्ताऐवज देऊ शकत नाहीत. म्हणून असे ठरविण्यात आले आहे की सर्व खात्यांत मिळून एकूण रु.५०,०००/- (पन्नास हजार रुपये) ची शिल्लक व एका वर्षात एकूण रु.१,००,००० (एक लाख रुपये) च्या जमा पेक्षा अधिक न करणाऱ्या ग्राहकांच्या संदर्भात नवीन खाते उघडण्यासाठी गैर बँकींग वित्तीय कंपन्यांकडून अनुपालीत आपला ग्राहक जाणा दिशा - निर्देशांना अधिक सोपे करावे.

३. त्यानुसार, जर एखादी व्यक्ती दिनांक २१ फेब्रुवारी २००५ च्या आमच्या उपरोक्त परिपत्रकाला जोडलेल्या बैकींग परिचालन आणि विकास विभागाच्या परिशिष्ट II मध्ये दिल्यानुसार दस्तावेज देऊ शकत नसेल आणि तिला खाते उघडायचे असेल तर गैर बँकींग वित्तीय कंपन्या परिच्छेद २ मध्ये दिल्यानुसार खालील अटी मान्य करुन खाते उघडू शकतात :-

अ) ज्या ग्राहकाच्या संदर्भात 'आपला ग्राहक जाणा' च्या संबंधी असलेली प्रक्रिया पूर्ण झाली आहे अशा ग्राहकाकडून परिचय, अशा परिचय कर्त्याचे गैर बॅंकींग वित्तीय कंपनीतील खाते कमीत कमी ६ महीने जुने असले पाहीजे आणि त्यातील व्यवहार समाधानकारक असला पाहिजे. ज्या ग्राहकाला खाते उघडायचे आहे अशा ग्राहकाचा फोटो आणि पत्ता या परिचयकर्त्याला प्रमाणित करावा लागेल.

किंवा

ब) खाते उघडू इच्छिणाऱ्या ग्राहकाची ओळख व पत्ता प्रमाणित करणारा इतर कुठलाही पुरावा जो गैरबॅंकींग कंपनीला मान्य आहे.

४. वरील प्रकारे खाते उघडताना, खातेदाराला हे स्पष्ट करावे की कधीही त्याच्या/तिच्या खात्यांतील एकूण शिल्लक रु.५०,०००/- (पन्नास हजार) पेक्षा जास्त झाली किंवा एका वर्षातील जमा रु १,००,०००/- (एक लाख) पेक्षा अधिक होईल, तेव्हा पासून त्या खात्यातील व्यवहार तोपर्यत बंद ठेवला जाईल जोपर्यत आपला ग्राहक जाणण्या संबंधातील सर्व दिशा-निर्देशांची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

ग्राहकाला असुविधा होऊ नये म्हणून जेव्हा खात्यांतील एकूण शिल्लक रु.४०,०००/- (चाळीस हजार) होईल किंवा एका वर्षातील एकूण जमा रु.८०,०००/- (ऐंशी हजार) होईल तेव्हा गैर बॅंकींग वित्तीय कंपनीने ग्राहकाला अधिसूचना द्यावी की त्याने/तिने आपला ग्राहक जाणण्या संदर्भात दिलेल्या दिशा-निर्देशांमध्ये दिलेली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले दस्तावेज प्रस्तुत करावेत. हे न झाल्यास एकूण शिल्लक रु.५०,०००/- (पन्नास हजार) झाल्यावर किंवा एका वर्षातील जमा रु.१,००,०००/- (एक लाख) झाल्यावर त्या खात्यातील व्यवहार पूर्ण थांबवण्यात येईल.

५.गैर बॅंकींग कंपन्यांना हे सूचित केले जात आहे की या संदर्भात अनुपालन होण्यासाठी त्यांनी त्यांच्या शाखांना योग्य ते अनुदेश द्यावते.

आपला विश्वासू

हस्ताक्षर
(पी. कृष्णमूर्ती)
प्रभारी मुख्य महा व्यवस्थापक